# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 April 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- हवामान बदलाच्या संकटावर जैन समाजाची शाश्वत जीवनशैली हाच उपाय– पंतप्रधानांचं प्रतिपादन
- जल व्यवस्थापनाच्या आधुनिकीकरणासाठी देशभरात ७८ पथदर्शी योजना राबवण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
- ‘संवाद मराठवाड्याशी’ उपक्रमाअंतर्गत विभागीय आयुक्त नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे उद्या संवाद साधणार
- अंमली पदार्थ नियंत्रण शाखेकडून लातूर जिल्ह्यात मोठी कारवाई करत १७ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

आणि

- जून ते सप्टेंबर कालावधीत देशात सरासरीच्या सुमारे १०३ टक्के पावसाचा अंदाज

****

हवामान बदल हे आजचं सर्वात मोठं संकट असून, जैन समुदायानं शतकानुशतके पाळलेली शाश्वत जीवनशैली हाच त्याचा उपाय असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आजच्या महावीर जयंतीनिमित्त नवी दिल्ली इथं काल नवकार महामंत्र दिवसानिमित्त एका कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. नवकार महामंत्र हा जैन धर्मातल्या अहिंसा, नम्रता आणि आध्यात्मिक उन्नतीच्या तत्वांचा मंत्र आहे. साधेपणा, संयम आणि शाश्वतता ही जैन समाजाच्या जीवनाचं मूळ असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

या कार्यक्रमात १०८पेक्षा अधिक देशांच्या नागरिकांसोबत पंतप्रधानांनी नवकार महामंत्राचं पठण केलं.

**

केंद्रीय मंत्रिमंडळानं कमांड एरिया डेव्हलपमेंट आणि जल व्यवस्थापनाच्या आधुनिकीकरणाला मान्यता दिली आहे. पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या उपयोजना म्हणून राबवल्या जाणाऱ्या या ७८ पथदर्शी योजनांमध्ये ८० हजार शेतकऱ्यांचा समावेश केला जाणार आहे. काल मंत्रिमंडळ बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. या योजनेमुळे शेतकऱ्यांना पाण्याच्या प्रत्येक थेंबाची जास्त पीक घेण्यास मदत होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट – अश्विनी वैष्णव, माहिती आणि प्रसारण मंत्री**

****

भारतीय रिझर्व्ह बँकेचं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतलं पतधोरण काल जाहीर झालं. बँकेने रेपो दरात पाव टक्के कपात करून तो सहा टक्क्यांवर आणला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ही माहिती दिली. २०२५-२६ साठीचा सकल देशांतर्गत उत्पादनासाठीचा अंदाजित दर सहा पूर्णांक ७ दशांश टक्क्यांवरून साडेसहा टक्क्यांपर्यंत तर किरकोळ महागाई दर ४ टक्के राहण्याचा अंदाज असल्याचंही मल्होत्रा यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या आरोग्य उपकेंद्र ते संदर्भ सेवा रुग्णालयांपर्यंत असलेल्या विविध आरोग्य संस्थांचं बळकटीकरण करण्यासाठी, एक विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याची सूचना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. विकास बँकेच्या सहकार्याने वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रकल्पांबाबत झालेल्या बैठकीत, ते काल बोलत होते. ज्याठिकाणी महाविद्यालयांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालयं संलग्न करण्यात आली आहेत अशा ठिकाणी, लोकसंख्या आणि रुग्णसंख्येच्या भारानुसार स्वतंत्र रुग्णालय निर्माण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्रयांनी यावेळी दिल्या.

****

शासनाच्या लोकोपयोगी योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सेवा संकल्प शिबीर, हा उपक्रम कौतुकास्पद असून, या शिबीराचा जनतेने अवश्य लाभ घ्यावा, असं आवाहन विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केलं आहे. परभणी जिल्ह्यात सेलू

इथं सेवा संकल्प शिबीरात ते काल बोलत होते. सेलू हे सौर शहर करण्याचा संकल्प निश्चितपणे पूर्ण होईल, तसंच परभणी जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही, त्यांनी दिली.
दरम्यान, हिंगोली जिल्ह्याच्या सेनगाव तालुक्यात हत्ता-साखरा-तळणी-सिंदगी या राज्य रस्त्याचं भूमिपूजनही, राम शिंदे यांच्या हस्ते काल झालं. या रस्त्यामुळे कमी वेळात वाहतुकीची सुविधा, तसंच शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

भगवान महावीर जयंती आज साजरी होत आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातल्या जनतेला महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस तीर्थंकर भगवान महावीरांचं जीवन कार्य तसंच त्यांच्या अहिंसा, त्याग, क्षमा, जीवदया आणि अनेकांतवादाच्या शिकवणीचं स्मरण करून देतो, असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.
छत्रपती संभाजीनगर शहरात महावीर जयंतीनिमित्त बाबा पेट्रोल पंप इथल्या महावीर चौकासह हडको आणि पैठण गेट इथून मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यामुळे छावणी लोखंडी पूल ते जिल्हा न्यायालय, कार्तिकी सिग्नल ते पंचवटी चौक, तसंच महावीर चौक उड्डाणपुलाखालचा रस्ता सकाळी दहा वाजेपर्यंत वहातुकीसाठी बंद राहणार आहे.

****

संवाद मराठवाडयाशी' या उपक्रमाअंतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे उद्या नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद साधणार आहेत. विभागातल्या आठही जिल्ह्यातून छत्रपती संभाजीनगरला प्रशासकीय कामानिमित्त येण्याचा नागरिकांचा वेळ आणि त्रास वाचावा या उद्देशानं हा उपक्रम सुरु करण्यात आला असून, प्रत्येक आठवड्यातून एकदा आयुक्त नागरिकांशी संवाद साधणार आहेत. उद्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत ते बोलणार असून, नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असं आवाहन विभागीय उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे यांनी केलं आहे.

****

अंमली पदार्थ नियंत्रण शाखेच्या पथकाने लातूर जिल्ह्यात मोठी कारवाई करून, १७ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले. चाकूर तालुक्यातल्या रोहिना गावात मुंबई आणि पुणे इथल्या अंमली पदार्थ नियंत्रण शाखेच्या पथकाकडून ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी अंमली पदार्थ नियंत्रक पथकानं पाच आरोपींना सोबत आणलं होतं, यात एका पोलीस कर्मचाऱ्याचा समावेश आहे. जप्त केलेल्या अंमली पदार्थांसह सर्व आरोपींना मुंबईला नेण्यात आलं असून, तिथेच पुढील कारवाई होईल, अशी माहिती लातूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिली.

दरम्यान, या आरोपींना मुंबईत घेऊन जात असताना शफिक मेमन या आरोपीने पळून जाण्याच्या उद्देशाने पथकाच्या गाडीचं स्टियरिंग फिरवलं, या प्रयत्नात वाहन उलटून एका दुचाकीलाही धडक बसली. या प्रकरणी शफीक मेमन विरोधात चाकूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

पैठण इथल्या संत ज्ञानेश्वर उद्यानाच्या जीर्णोद्धाराकरता १४९ कोटी रुपयांच्या कामांना गती देण्याच्या सूचना पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या आहेत. मुंबईत काल पैठण पर्यटन विकास आराखड्यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. हा निधी टप्प्याटप्प्याने वितरीत केला जाणार असून, या कामाला प्राधान्य देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

****

धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालय आणि मृदा आणि जलसंधारण विभागाच्या वतीने अमृत सरोवर योजनेच्या दुसर्या टप्प्याचं उद्घाटन काल धाराशिव तालुक्यातल्या सिंगोली सिंचन तलाव इथं जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते झालं. या योजनेतून सिंगोलीत सिंचन तलावातून ५० हजार घनमीटर गाळ काढण्याचं नियोजन असून, यामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित होणार आहे.

****

प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, या मागणीसाठी काल हिंगोली जिल्ह्यात डोंगरकडा इथं स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं. शक्तिपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या हरकती असताना, शासनाने शेतकऱ्यांवर दबाव आणू नये, कोणत्याही परिस्थितीत हा महामार्ग होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

****

बीड जिल्ह्यात सौर ऊर्जा प्रकल्पाला विरोध दर्शवत तीन गायरान जमीन धारकांनी, सदर जमिनीतून बेदखल करण्यासाठी आलेल्या पोलिसांसमोरच विष प्राशन केलं. अंबाजोगाई तालुक्यातल्या जवळगाव इथं काल ही घटना घडली. या तिघांना उपचारासाठी अंबाजोगाई इथल्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या येरमाळा इथल्या येडेश्वरी देवीच्या यात्रेमुळे उद्यापासून १३ तारखेपर्यंत छत्रपती संभाजीनगर कडे जाणाऱ्या वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. रुग्णसेवा, अग्निशमन दलाची वाहनं आणि अत्यावश्यक सेवेतल्या वाहनांनाच या मार्गावरुन जाता येईल, असं प्रशासनातर्फे सांगण्यात आलं आहे.

****

जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात सरासरीच्या सुमारे एकशे तीन टक्के पाऊस होईल, असा अंदाज हवामान विषयक खासगी संस्था 'स्कायमेट'ने व्यक्त केला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, यंदाचा पावसाळा देशासाठी सकारात्मक ठरेल, तसंच देशात एकंदर पावसाची स्थिती अनुकूल राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जलसंधारण, पाणीसाठा व्यवस्थापन आणि शेती योजना आखण्यासाठी हा अंदाज उपयुक्त ठरेल.

दरम्यान, राज्यात काल सर्वाधिक ४४ पूर्णांक एक अंश सेल्सिअस तापमान अकोला इथं इतकं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव इथं ४० अंश, छत्रपती संभाजीनगर इथं ४१ पूर्णांक सहा तर परभणी इथं ४१ पूर्णांक तीन अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****